पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. अ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक १
सभावृत्तांत

दिनांक – २८/०४/२०१४ वेळ : सकाळी १०.३०

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.अ प्रभाग समितीची सभा सोमवार दि.२८/०४/२०१४ रोजी सकाळी १०.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील मा.महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.श्री. उल्हास शेट्टी
२. मा.सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे
३. मा.भारती फरांदे
४. मा.आर.एस.कुमार
५. मा.जावेद रमजान शेख
६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७. मा.पांढरकर निलेश शंकरराव
८. मा.राजू मिसाळ
९. मा.नंदा विकास ताकवणे
१०. मा.नेटके सुमन राजेंद्र
११. मा.तरस बाळासाहेब जयवंत
१२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१३. मा.पवार मनिषा काळूराम
१४. मा.प्रसाद शेट्टी
१५. मा.अविनाश (दादा) टेकवडे
१६. मा.सौ. साळुंके सविता सुरेश

याशिवाय मा.श्री.पी.एच.झुरे, सह आयुक्त, मा.श्री.पी.एस. खांडकेकर, क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय, मा.श्रीम.रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

-------

**मुख्य कार्यकारी अधिकारी - (पिठासीन अधिकारी)** सन्मा.सदस्य, मा. क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे मा. अ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा)** मा.अ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण ०४ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | ठोंबरे सुभद्रा ईश्वर | सौ.साळुंके सविता सुरेश | काळभोर वैशाली जालिंदर |
| २. | जावेद रमजान शेख | अविनाश (दादा) टेकावडे | बाबर शारदा प्रकाश |
| ३. | जावेद रमजान शेख | राजू मिसाळ | तरस बाळासाहेब जयवंत |
| ४. | ठोंबरे सुभद्रा ईश्वर | भारती फरांदे | प्रसाद शेट्टी |

(मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभा शाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त ०४ नामनिर्देशन पत्रे मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा. पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली. )

**मुख्य कार्यकारी अधिकारी - (पिठासीन अधिकारी)** मा. अ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त दोन उमेदवारांची एकूण ४ नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असून ती ४ नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत.

त्यामध्ये मा.अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर व मा.जावेद रमजान शेख हे दोन रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे देवुन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(मा. पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला सकाळी १०.४३ ते १०.५८ हा १५ मिनिटांचा कालावधी संपला. )

**मुख्य कार्यकारी अधिकारी - (पिठासीन अधिकारी)** उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये मा. अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. जावेद रमजान शेख यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या वेळेमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेतला असलेने मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक – १

दिनांक – २८/०४/२०१४ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरीता १) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर २) मा.जावेद रमजान शेख या दोन उमेदवारांनी प्रत्येकी दोन या प्रमाणे एकूण ०४ नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून त्यापैकी ०४ वैध व ० अवैध ठरलेली आहेत. त्यामधील उमेदवार **मा.जावेद रमजान शेख** यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतली असल्याने अ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरिता **मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर** हे एकच उमेदवार असल्याने मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदावर बिनविरोध रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

-----

यानंतर मा. पिठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
**(कांतीलाल उमाप)**
पिठासीन अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : अक्षेका/११/कावि/ 157 /२०१४
दिनांक : २८/०४/२०१४

सही/-
**प्रशासन अधिकारी**
तथा सचिव सभा शाखा
अ प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
मा. अ प्रभाग समिती

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक – १

दिनांक – २८/०४/२०१४ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरीता १) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर २) मा.जावेद रमजान शेख या दोन उमेदवारांनी प्रत्येकी दोन या प्रमाणे एकूण ०४ नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून त्यापैकी ०४ वैध व ० अवैध ठरलेली आहेत. त्यामधील उमेदवार **मा.जावेद रमजान शेख** यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतली असल्याने अ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरिता **मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर** हे एकच उमेदवार असल्याने मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदावर बिनविरोध रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

सही/-
**(कांतीलाल उमाप)**
पिठासीन अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे